Purushottam Khaparde Health & Education Society's
**Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur**
■ Recognized by Government of Maharashtra ■ Affiliated to RTM University, Nagpur
SNEH NAGAR, WARDHA ROAD, NAGPUR - 440 015. (M S) INDIA
Accredited B++ (2.97CGPA) by NAAC
■ Tel. : 0712 - 2290368 ■ Website : www.yashodagirlscollege.edu.in ■ Email : ygc.ngp@rediffmail.com

# NATIONAL SERVICE SCHEME (NSS)

# ANNUAL ACTIVITIES (2023-2024)

| SR. NO. | ACTIVITY | DATE |
|---|---|---|
| 1 | STUDENTS MEETING & REGISTRATION | 26/07/2023 |
| 2 | TREE PLANTATION PROGRAM AT VITTHAL RUKMINI MANDIR | 01/08/2023 |
| 3 | VOTERS AWARENESS PROGRAM | 05/08/2023 |
| 4 | ORGAN DONATION WORKSHOP | 11/08/2023 |
| 5 | CLEANLINESS DRIVE AT COLLEGE PREMISES | 14/08/2023 |
| 6 | PLANTS DISTRUBUTION TO STUDENTS | 14/08/2023 |
| 7 | INDEPENDEANCE DAY | 15/08/2023 |
| 8 | NATIONAL STUDENTS ENVIRONMENT COMPITITION | 15/08/2023 |
| 9 | ANNUAL MEETING & POCSO & POSH WORKSHOP | 18/08/2023 |
| 10 | VRUKSHDINDI | 19/08/2023 |
| 11 | HATTIROG NIRMULAN (FILERIA) | 19/08/2023 |
| 12 | WORKSHOP ON MERI MATI MESRA DESH | 06/09/2023 |
| 13 | VISIT TO OLD AGE HOME | 07/09/2023 |
| 14 | CLEANLINESS DRIVE WORKSHOP AT RTMNU NAGPUR | 08/09/2023 |
| 15 | YOGA & MEDITATION WORKSHOP | 09/09/2023 |
| 16 | R.D. PARADE SELECTION TRIAL AT N.S.S DEPARTMENT R.T.M. NAGPUR | 12/9/2021 |
| 17 | AWARENESS RALLEY ON THE OCCASION OF WORLD OZONE DAY | 16/9/2023 |
| 18 | MATI KE SANG SELFI | 16/9/2023 |
| 19 | NSS DAY ( HEALTH AWARENESS PROGRAM) | 25/9/2023 |
| 20 | CLEANLINESS DRIVE AT PSC CENTRE (NMC) KHAMLA, NAGPUR | 26/9/2023 |
| 21 | CLEANLINESS DRIVE AT GANDHI SAGAR | 01/10/2023 |
| 22 | MAHATMA GANDHI & LAL BAHADUR SHASTRI JAYANTI | 02/10/2023 |
| 23 | ONLINE - POLICE TRAINING REGISTRATION | 25/10/2023 |
| 24 | SARDAR VALLABBHAI PATEL JAYANTI | 31/10/2023 |
| 25 | BHRASTACHAR VIRODHI JANGAGRUTI | 31/10/2023 |
| 26 | FREE EYE CHECK UP CAMP | 28/12/2023 |
| 27 | HEALT AWARENESS PROGRAM | 15/01/2024 |
| 28 | NSS ANNUAL CAMP | 05-11/02/2024 |
| 29 | HUMAN TRAFFICKING | 22/02/2024 |
| 30 | SAVE WATER AWARENESS PROGRAM | 20/03/2024 |
| 31 | SAVE WATER DAY | 22/03/2024 |

| Sr. No. | Date & Name of Activity | Report |
|---|---|---|
| 1 | **Date: Wednsday, 26/07/2023**<br>**Students Meeting and Registration**<br>**(राष्ट्रीय सेवा योजना सभा)**<br> | महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रोजी विद्यार्थिनी करिता राष्ट्रीय सेवा योजना सभा घेण्यात आली. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी प्रास्ताविकेत राष्ट्रीय सेवा योजना विषयी सविस्तर माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. सर्व कार्यक्रमात विद्यार्थीनिनी सहभाग घ्यायला पाहिजे ज्याचा फायदा विद्यर्थिनीना होतो. याबद्दल माहिती दिली. व विद्यार्थीनीना नामांकन करण्यास प्रोत्साहित केले. डॉ. महेंद्र कटरे यांबी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यश्स्वीते करिता राष्ट्रीयसेवायोजना समितीने सहकार्य केले. |
| 2 | **Date: Tuesday, 01/08/2023 (वृक्षारोपण)**<br>**Tree Plantation Program at Vitthal Rukmini Mandir Sneh Nagar**<br> | महाविद्यालयातर्फे विठ्ठल रुक्मिणी मंदिर स्नेह नगर येथे वृक्षारोपण करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना च्या विद्यार्थिनी व शिक्षकांनी अनेक रोपटे मंदिर परिसरात लावली. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांनी पर्यावरण संतुलनाकारिता वृक्षारोपण करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेन्द्र कटरे यांनी केले. |
| 3 | **Date: Saturday, 05/08/2023**<br>**Voters Awareness (मतदार नोंदणी अभियान)**<br>यशोदा महाविद्यालयात मतदार नोंदणी<br>नागपूर : यशोदा मुलींचे कला व वाणिज्य महाविद्यालय आणि तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींकरिता नुकताच मतदार नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यांप्रसंगी ६५ विद्यार्थिनींनी मतदानासाठी नोंदणी केली.<br>दुर्गाप्रसाद हेडाऊ व बैस यांनी मतदानाचे महत्व सांगितले तर, प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमात प्रा. राजेश घोगरे, डॉ. शरद सांबारे, डॉ. प्रमोद फटिंग, डॉ. के. जी. मेश्राम, डॉ. सुधाकर थुल, डॉ. सूर्यकांत कापशीकर, डॉ. गोविंद रावलेकर, डॉ. अमोल राऊत आदी उपस्थित होते. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी सूत्रसंचालन तर, डॉ. महेंद्र कटरे यांनी आभार व्यक्त केले.<br> | महाविद्यालयातर्फे शनिवार ५२ नागपूर दक्षिण पश्चिम मतदार संघ, तहसील कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन मतदार विद्यार्थिनीकरिता "मतदार नोंदणी" अभियान राबवण्यात आले. त्या करिता श्री. दुर्गाप्रसाद हेडाऊ व श्री. बैस यांनी विद्यार्थीनीना मतदानाचे महत्व, मतदानाचा अधिकार याविषयी माहिती दिली. मतदानाचा अधिकार पूर्णकरण्याकरिता मतदार यादीत आपले नाव असणे आवश्यक आहे. त्याकरिता सर्वप्रथम मतदार यादीत नाव नोंदवावे लागेल असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांनी विद्यार्थीनीना मतदानाचा अधिकार हा नागरिकाचा घटनादत्त अधिकार आहे व प्रत्येक युवक-युवतींनी तो स्धिकार वापरून लोकशाही बळकट केली पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेन्द्र कटरे यांनी केले. |

<table>
<tr>
<td>4</td>
<td>Date: Friday, 11/08/2023 (अवयव  दान)<br>Organ Donation Workshop<br>
</td>
<td>अवयव दान जनजागृती महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा  योजना विभागातर्फे अवयव दान जनजागृतीच्या उद्देशाने  कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत  मार्गदर्शन करिता किंग्स्वे हॉस्पिटल नागपूर येथील डॉ. शालिनी पाटील यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थीनीना अवयव दान म्हणजे काय? त्याची संकल्पना, अवयव दान विषयी गैरसमज, कायदा, अवयव दानाचे महत्व, कोण-कोणते अवयव दान करता येते. कोण केंव्हा अवयव दान करू शकतो, अवयव दान करिता नाव नोंदणी,  याची संपूर्ण प्रक्रिया सांगितली. त्यांचे हॉस्पिटल  अवयव दान मोहिमे करिता कसे कार्य करते याची माहिती दिली. अवयव दान हे श्रेष्ठ दान आहे  हि जागरुकता प्रत्येक व्यक्तीत रुजवीण्याचे काम विद्यार्थी करू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांनी अवयवदानामुळे मिळणारे जीवनदान व त्यापासून मिळणारा सेवाभावाचा आनंद याची इतर बाबीसोबत तुलनाच करता येत नाही असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन  डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेंद्र कटरे यांनी केले.</td>
</tr>
<tr>
<td>5</td>
<td>Date: Monday, 14/08/2023<br>(स्वच्छता अभियान)<br>Cleanliness Drive at College Premises<br>
</td>
<td>विध्यार्थिनी द्वारे महाविदयालय परिसर, व आजूबाजूचा परिसर, विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोरील संपूर्ण  परिसर स्वच्छ करण्यात आला.<br></td>
</tr>
<tr>
<td>6</td>
<td>Date: Monday, 14/08/2023 (वृक्षवाटप)<br>Plants Distribution to Students<br>
<br>
</td>
<td>वृक्ष वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांनी "वृक्ष लागवड" काळाची गरज आहे या विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरण संतुलनाकारितावृक्षारोपण करणे गरजेचे आहे. तसेच केवळ वृक्ष लावून चालणार नाही तर त्याचे संगोपन करणे देखील महत्वाचे आहे. प्रत्येकाने आपल्या घरी किंवा आजूबाजूच्या परिसरात किमान एक तरी रोप लावून ते जागवण्याचा प्रयत्न करावा असे मत त्यांनी  व्यक्त केले. प्राचार्य डॉ. धनराज शेटे, प्रा. राजेश घोगरे, डॉ. शरद सांबारे व इतर प्राध्यापकांच्या हस्ते विद्यार्थीनीना रोपटे (वृक्ष) वाटप करण्यात आले.  कार्यक्रमाचे आयोजन व संचालन डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेन्द्र कटरे  यांनी केले.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| 7 | **Date: Tuesday, 15/08/2023**<br>**Independence Day (स्वातंत्र्यदिन)**<br><br><br> | स्वातंत्र्यदिनानिमीत्य आयोजित ध्वजारोहणचा कार्यक्रम करण्यात आला. ध्वजारोहण संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्यांच्यासोबत प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर उपस्थित होते. राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत म्हणण्यात आले. त्यानंतर शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे व श्री मनीष खापर्डे उपस्थित होते. विद्यार्थीनिंद्वारे देशभक्तीपर भाषण व गीत प्रस्तुत करण्यात आले. डॉ. गोविंद रावळेवकर व प्रा. राजेश घोगरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे यांनी विद्यार्थीनीना सक्षम नागरिक बना व स्वतःचे तसेच महाविद्यालयाचे नाव मोठे करा असे मत व्यक्त केले. डॉ. गोविंद रावळेवकर व प्रा. राजेश घोगरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. देशाचा राष्ट्रध्वज, स्वातंत्रासाठी शहीद झालेले सर्व वीर, देशाचे जवान, देशाचे संविधान, यांचा सन्मान व आदर ठेवायला पाहिजे. देशाची धुरा नवीन पिढीकडे आहे. ते तुम्ही नक्कीच कराल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थिती होते. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी कार्यक्रमाचे संचालन व डॉ. महेंद्र कटरे यांनी आभार व्यक्त केले. |
| 8 | **Date: Tuesday, 15/08/2023**<br>**National Students Environment Compitition**<br>**(राष्ट्रीय विद्यार्थी पर्यावरण स्पर्धा)**<br> | स्वातंत्र्यदिनानिमीत्य आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमा नंतर शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर "राष्ट्रीय विद्यार्थी पर्यावरण स्पर्धा" मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थिनीचे नामांकन करण्यात आले. नामांकन प्रक्रीयेत विद्यार्थिनीचा भरघोस प्रतिसाद मिळाला. नामांकन प्रक्रीयेकरिता डॉ. अमोल राउत, डॉ. महेंद्र कटरे व डॉ. ललिता पुन्नय्या यांनी सहकार्य केले. |
| 9 | **Date: Friday, 18/08/2023**<br>**Annual Meeting, POCSO & POSH Workshop (एक दिवसीय कार्यशाळा)**<br><br> | राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर व साक्षी फाउंडेशन नागपूर अंतर्गत रक्षीन प्रकल्पाच्या माध्यामा द्वारे संयुक्त विद्यमाने POCSO & POSH या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा व विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक नियोजन सभेचे आयोजन डॉ. सुभाष चौधरी, म. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेत डॉ. संजय दुधे, मा. प्र-कुलगुरू यांच्या प्रमुख उपस्थित चिटणीस सेंटर सिव्हील लाईन येथे आयोजित करण्यात आले. कार्यक्रमात साक्षी फाउंडेशनच्या समन्वयक स्मिता भारती व त्यांच्या चमुंनी POCSO & POSH याच्या अंतर्गत Gender Equality, Sexual Harassment, Child Abuse अश्या अनेक विषयावर मार्गदर्शन केले. चित्रफित दाखविण्यात आले. त्यावर सर्वांचे मत विचारण्यात आले. डॉ. संजय दुधेमा. प्र-कुलगुरू यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमानंतर डॉ. सोपानदेव पिसे संचालक राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांनी राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे यांनी सहभाग घेतला. |

<table>
<tr>
<td>10</td>
<td>

**Date: Friday, 19/08/2023**<br>**Vruksh- Sindi (वृक्ष दिंडी, वृक्षारोपण व माटी को नमन वीरो को वंदन)**







</td>
<td>राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारे शासनाच्या निर्देशानुसार मेरी माटी मेरा देश अंतर्गत वृक्ष दिंडी, वृक्षारोपण व माटी को नमन वीरो को वंदन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ दीक्षांत सभागृह छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर महाराजबाग चोक येथे आयोजित करण्यात आले. वृक्ष दिंडीची सुरवात दीक्षांत सभागृह छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर ते जीरो माईल व वृक्ष दिंडीची समाप्ती विद्यापीठ दीक्षांत सभागृह येथे करण्यात आले. त्यानंतर डॉ. सोपान पिसे समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्यासह सर्वांनी मेरी माटी मेरा देश अंतर्गत शपथ घेतली. माटी को नमन वीरो को वंदन हा कार्यक्रम घेण्यात आला. हा कर्यक्रम प्रा कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे व विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.</td>
</tr>
<tr>
<td>11</td>
<td>

**Date: Saturday, 19/08/2023**<br>**हत्तीरोग निर्मुलन कार्यक्रम**<br>**Hatiorog Nirmulan (Fileria)**








</td>
<td>हिवताप व हत्तीरोग विभाग नागपूर यांच्या पत्रानुसार (I.D.A) अंतर्गत ट्रिपल ड्रग थेरपी २०२३-२०२४ नुसार जनतेमध्ये हत्तीरोगाचे संक्रमण थांबाविण्याकरिता जागतिक आरोग्य संस्थेद्वारे (WHO) मास ड्रग्ज अँड्मिनीस्ट्रेन अंतर्गत आयवरमेकटीन, दि.ई.सी. अल्बेंडाझाल (I.D.A) यांचे संयुक्त वापर करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. या मोहिमे अंतर्गत महाविद्यालयात हत्तीरोग निर्मुलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याकरिता आरोग्य कर्मचारी डॉ. मंजुषा मट्टापटी (मेडीकल ऑफिसर नागपूर महानगर पालिका नागपूर तसेच स्वाती पडोळे (परिचारिका), श्रीमती प्रियांका रंगारी (आशा वर्कर) आणि त्यांची चमू उपस्थित होते..डॉ. मंजुषा मट्टापटी यांनी हत्तीरोग विषयी माहिती दिली. हत्तीरोग होण्याची कारणे, रोगाचे लक्षणे व त्यावर उपाय याविषयी माहिती दिली व लोकांमध्ये हत्तीरोग विषयी जनजागृती करण्याचे आव्हान केले. प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. हत्तीरोग निर्मुलन कार्यक्रमाचे मुख्य उद्देश हत्तीरोगाचे संक्रमण थांबाविणे. लोकांनमधील गैरसमज दूर करणे. विद्यार्थी हा समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. तो हे काम नक्कीच करू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले.मार्गदर्शना नंतर मेडीकल ऑफिसर, परीचारीका आशा वर्कर आणि त्यांची चमू यांच्या समक्ष विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना गोळ्या (औषध) खायला दिले. जास्तीत जास्त विद्यार्थीनिनी आयडीए मोहिमेचा लाभ घेतला.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| 12 | **Date: Tuesday, 06/09/2023**<br>**Workshop on Meri Mati Mesra Desh (मेरी माटी मेरा देश अंतर्गत माटी को नमन वीरो को वंदन)**<br> | राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारा शासनाच्या निर्देशानुसार मेरी माटी मेरा देश अंतर्गत माटी को नमन वीरो को वंदन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ दीक्षांत सभागृह छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर महाराजबाग चोक येथे आयोजित करण्यात आले. हा कर्यक्रम श्री राजेश पांडे राज्यसल्लागार समिती सदस्य यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आला. डॉ. सोपान पिसे समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर उपस्थित होते. डॉ. सोपान पिसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री संजय चाकने राज्यसल्लागार समिती सदस्य पुणे, माटी को नमन वीरो को वंदन याविषयावर मार्गदर्शन केले. व प्रतेकाना हातात माती घेऊन सेल्फी काढून अपलोड करायला लावले. कार्यक्रमाची सुरवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी डॉ. ललिता पुन्नय्या यांनी सहभाग घेतला. |
| 13 | **Date: Tuesday, 07/09/2023**<br>**Visit to Old Age Home (मधुरांगण ´वृद्धाश्रम´व व्यसनमुक्ती केंद्रला भेट)**<br> | मधुरांगण´वृद्धाश्रम´व व्यसनमुक्ती केंद्र मनीष नगर नागपूर येथे भेट कार्यक्रम राबवण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थीनिनी वृद्धाश्रमला भेट दिली. मधुरांगण संस्थेची केअर टेकर श्रीमती रश्मी बावणे यांच्याकडूनसंस्थेची कार्यप्रणाली, तेथे राहणाऱ्या व्यक्तींची संपूर्ण माहिती जाणून घेतली. विद्यार्थीनिद्वारे वृद्धाश्रमातील प्रत्येक व्यक्तींसोबत हितगुज केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकारिता वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. विनोद गजघाटेसर व यशोदा महाविध्यालयातील डॉ. शरद सांबारे, डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे, डॉ. अमोल राउत, डॉ. सुधाकर थूल व विद्यार्थिनीचे सहकार्य लाभले. |
| 14 | **Date: Friday, 08/09/2023**<br>**Workshop on Cleanliness Drive at RTMNU Nagpur (स्वच्छता कार्यशाळा)**<br> | भारत सरकार युवा कार्य एवं खेळ मंत्रालय रासेयो क्षेत्रीय निर्देशालय, पुणे (महाराष्ट्र एवं गोवा) यांच्या निर्देशानुसार शुक्रवार दिनांक ०८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरविद्यापीठ मुख्य इमारत, , , महाराजबाग समोरसीताबर्डी अमरावती रोड नागपूर येथे एक दिवसीय स्वच्छता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यशाळेत विद्यार्थिनीचे नामांकन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थीनीना ग्रुप नुसार विद्यापीठ परिसर, फ्रीडम पार्क, महाराजबाग परिसर स्वच्छ करण्यास सांगितले. सर्व विद्यार्थीनिनी मंचावर येऊन आप-आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थीनीना प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यशाळेत महाविद्यालयातील ०३ विद्यार्थीनिनी सहभाग घेतला. |

| | | |
|---|---|---|
| 15 | **Date: Saturday, 09/09/2023**<br>**Yoga & Meditation Workshop**<br>**(योगा आणि मेडीटेशन कार्यशाळा)**<br><br><br><br> | समर्पण ध्यान (मेडिटेशन) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मार्गदर्शन करिता श्री. कीर्ती आस्तिक, श्री निरव खिया, योगी महर्षी श्री. शिवकृपानंद स्वामी समर्पण ध्यानयोग फौंडेशन मुंबई तसेच त्यांचे सहकारी ओमप्रकाश जी जयसवाल, श्रीमती मंगला नंदनवार, श्री सुरेश यादव, नागपूर यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.श्री. कीर्ती आस्तिक, यांनी योगी महर्षी श्री. शिवकृपानंद स्वामी समर्पण ध्यानयोग फौंडेशन या संस्थेची माहिती, कार्यप्रणाली याविषयी सांगितले. सुंदर स्वस्थ जीवन जगण्याची कला, सकारत्मकता, एकाग्रता, निणर्य क्षमता, मेमरी पावर वाढविणे, मनशांती, स्वतःच्या व दुसऱ्यांच्या आनंदासाठी समर्पण ध्यान (मेडिटेशन) चा कसा प्रयोग करावा तसेच हि सहज क्रिया कोणी करू नये व केव्हां करू नये हे देखील सांगितले. प्रार्थना सांगून ध्यान क्रिया चे प्रात्यक्षिक करून दाखविले. व प्रत्येकानां करावयास सांगून स्वतः शांतीचा अनुभव करण्यास सांगितले. रोज ध्यान हि क्रियाकरून मनाला स्थिर करणे, सकारात्मक भावना, विचारवृत्ती वाढते व व्यक्ती वर्तमानात जगणे शिकतो. समर्पण ध्यानामुळे शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक व अध्यात्मिक फायदा होतो. म्हणजेच व्यक्तीचा सर्वागीण विकास होतो असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांनी यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत विध्यार्थीनिंनि भरघोस प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. ललिता पुन्नय्या यांनी केले. |
| 16 | **Date: Tuesday, 12/09/2023**<br>**R. D. Parade Selection Trial at NSS Department RTMNU, Nagpur**<br>**(राष्ट्रीय व राज्य स्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचालनाकरिता स्वयसेवकाची निवड प्रक्रिया)** | प्री.आर.डी. निवड प्रक्रिया -पत्र क्रासेयो/प्रजादिन/२०२३-२४/४८ दिनांक ०८/०९/२०२३. नुसार २६ जानेवारी २०२४ ला होणाऱ्या राष्ट्रीय व राज्य स्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचालनाकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयसेवकाची निवड प्रक्रिया मंगळवार दिनांक १२ सप्टेबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, विद्यापीठ मुख्य इमारत, महाराजबाग समोर, सीताबर्डी अमरावती रोड नागपूर येथे आयोजित करण्यात आली. त्या निवड प्रक्रियेत महाविद्यालयातील ३ विध्यार्थीनीनि सहभाग घेतला. |
| 17 | **Date: Saturday, 16/09/2023**<br>**Awareness Ralley on the Occasion of World Ozone Day (ओझोन डे)**<br><br><br><br> | ओझोन दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कर्यक्रमात प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांनी"ओझोन डे" केंव्हा व का सुरु करण्यात आले. या विषयावर मार्गदर्शन केले. ओझोन लेअर सुरक्षा कवच म्हणून कसे कार्य करते, ओझोन लेअर कमी झाल्याने आरोग्यावर व पर्यावानावर त्याचा विपरीत परिणाम कसा होतो याची माहिती दिली. ओझोन लेअर सुरक्षित ठेवण्याकरिता पर्यावरण संतुलन आवश्यक आहे. पर्यावरण संतुलनाकरिता जास्तीत जास्त वृक्ष लावणे व त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. तसेच विविध प्रकारचे प्रदूषण जसे मृदा, जल, ध्वनी, वायू प्रदूषण टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच बी. ए. भाग २ ची विद्यार्थी कु. पिंकी विश्वकर्मा हिने ओझोन डे विषयी आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर परिसरात रॅली काढण्यात आली. कार्यक्रमात विद्यार्थीनिनि व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. |

| | | |
|---|---|---|
| 18 | **Date: Saturday, 16/09/2023**<br>**Mati Ke Sang Selfi (माटी के संग सेल्फी)**<br> | माटी के संग सेल्फी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कर्यक्रमात प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांनी"मेरी माटी मेरा देश" या विषयावर मार्गदर्शन केले. जो मातीचा कलश आहे त्याचा वापर आपण झाडांसाठी (वृक्ष रोपणासाठी) करणार आहोत. असे मत त्यांनी व्यक्त केले.आपण सर्व धरतीला म्हणजेच मातीला नमन करू व वीर जवानांना वंदन करू असे सांगून त्यांनी सर्वांना शपथ घेण्यास सांगितले. सर्वांनी मातीसोबत सेल्फी काढली व अपलोड केली. कार्यक्रमात सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थीनिनि सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजनाकरीता राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ललिता पुन्नय्या डॉ. महेंद्र कटरे व सदस्य डॉ. अमोल राउत यांचे सहकार्य लाभले. |
| 19 | **Date: Monday, 25/09/2023**<br>**NSS Day – Health Awareness Program (राष्ट्रीय सेवा योजना दिन-आरोग्याची काळजी)**<br><br> | राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्य "आरोग्याची काळजी" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता डॉ. मोनाली वानखेडे (BAMS) कायामृत आयुर्वेद चिकित्सालय व पंचकर्म, नागपूर. यांना आमंत्रित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला बी. ए. भाग २ ची विद्यार्थीनि कु. नेहा कश्यप हिने राष्ट्रीय सेवा योजना दिन विशेष निमित्य राष्ट्रीय सेवा योजनाची सुरवात केंव्हा व का करण्यात आली.राष्ट्रीय सेवा योजनाचे महत्व, उद्दिष्ट, बिल्ला, बोधवाक्य, या विषयी माहिती दिली. डॉ. मोनाली वानखेडे यांनी आयुर्वेदिक दिनचर्या कशी असावी याविषयी मार्गदर्शन केले. त्यात प्रकृतीचे प्रकार (वात, पित्त, कफ ) त्याचे गुण दोष, त्यानुसार सात्विक आहार केंव्हा व कसे घ्यावे. पाणी केंव्हा व कसे प्यावे. फळ व सुका मेव्याचे सेवन केंव्हा करावे. त्यासोबतच विश्रांती (पुरेशी झोप ), योग्य व्यायाम, मेडीटेशन याविषयी सांगितले. या सर्वांमुळे आपले केस व त्वचा चांगली राहते तसेच शारीरिक व मानसिक आरोग्य स्वस्थ राहते. असे असे मत त्यांनी व्यक्त केले.प्राचार्य डॉधनराज शेटे सर यांनीविद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ललिता पुन्नय्या यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. महेंद्र कटरे यांनी आभार व्यक्त केले. |
| 20 | **Date: Tuesday, 26/09/2023**<br>**Cleanliness Drive at PSC Centre (NMC) Khamla (स्वच्छता अभियान)**<br> | स्वच्छता अभियान-प्राथमिक आरोग्य केंद्र महानगरपालिका खामला नागपूर (पांडे ले आउट) येथे भेट दिली.व स्वच्छता अभियान कार्यक्रम राबवण्यात आले. डॉ. केतकर यांनी विद्यार्थीनीना स्वच्छतेचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. स्वच्छतेच्या अभावी (गलिच्छ किवा अस्वच्छता), दुषित पाणी, दुषित वातावरणामुळे होणारे आजार, याची माहिती दिलील तसेच त्यावर उपाययोजना सांगितले. मार्गदर्शनानंतर लगेच स्वच्छता अभियान अंतर्गत विद्यार्थिनी द्वारे संपूर्ण परिसरस्वच्छ करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| 21 | **Date: Sunday, 01/10/2023**<br>**Cleanliness Drive at Gandhi Sagar (स्वच्छता अभियान)**<br>  | स्वच्छता अभियान –भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालय अंतर्गत केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, मार्फत राष्ट्रीय सेवा योजना नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारा रविवार दिनांक ०१/१०/२०२३गांधी सागर तलाव(शुक्रवारी तलाव) येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यात ०५ विद्यार्थीनिनी व डॉ. महेंद्र कटरे, डॉ. अमोल राऊत यांनी सहभाग घेतला. |
| 22 | **Date: Monday, 02/10/2023**<br>**Cleanliness Drive- Mahatma Gandhi & Lal Bahadur Shastri Jayanti (स्वच्छता अभियान- महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)**<br> | महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती – महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांच्या हस्ते दोन्ही विभूतींच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. त्यांनी दोन्ही थोर पुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांचे आदर्श समोर ठेवून आपल्या जीवनात वर्तन करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर सर्व प्राध्यापकांनी व विद्यार्थीनिनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. ललिता पुन्नय्या यांनी केले. तसेच महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्य स्वच्छता अभियान कर्यक्रम राबविण्यात आला. प्राध्यापक व विद्यार्थिनी द्वारे महाविद्यालय व आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला. |
| 23 | **Date: Thursday, 26/09/2023**<br>**Online- Police Trainning Registration (स्वच्छता अभियान)**<br><br> | पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण – मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रासेयो, मंत्रालय कक्ष, मुबंई यांच्या परिपत्रकानुसार युवा खेल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र पोलीस विभागाच्या सहकार्याने रासेयो स्वयंसेवकांसाठी सरकार द्वारे पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.विद्यार्थीनीना पोलीस अनुभवात्मक शिक्षणाच्या संधी युवा पोर्टल वर पाहता येईल. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी पोर्टलद्वारे ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे अशी माहिती प्रा. ललिता पुन्नय्या यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत दिली. प्रा. महेंद्र कटरे यांनी नामांकनाची प्रक्रिया सांगितली. प्रा. अमोल राउत यांनी ऑनलाईन नोंदणी कश्याप्रकारे करावे याचे प्रात्याक्षिक करून दाखवले व विद्यार्थीनिद्वारे करून घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थीनीचा चांगला प्रतिसाद मिळाला. |

<table>
<tr>
<td>24</td>
<td>Date: Tuesday, 31/10/2023<br>National Intigration Day- Sardar Vallabbhai Patel Jayanti (सरदार वल्लभभाई पटेल जयंती - राष्ट्रीय एकता दिवस)<br>



</td>
<td>सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्य राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रम आयोजित केला. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांच्या हस्तेसरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांचे आदर्श समोर ठेवावे व एक चांगले नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा असे मत त्यांनी व्यक्त केले. राष्ट्राची सुरक्षा एकता आणि अखंडता मजबूत करण्यास आपण प्रतिबद्ध आहोत त्यासाठी आपण प्रयत्नशील असावे. असे मत यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. त्यानंतर डॉ. महेंद्र कटरे यांच्या सह सामूहिकरीत्या "राष्ट्रीय एकता दिवस शपथ" ग्रहण करण्यात आले.सर्व प्राध्यापकांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. कार्यक्रमाचे संचालनडॉ. सुर्यकांत कापसिकर वआभार डॉ. ललिता पुन्नय्या यांनी केले.या कार्यक्रमात प्रा. राजेश घोगरे, डॉ. शरद सांबारे, व इतर सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ.ललिता पुन्नय्या व डॉ. महेंद्र कटरे यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमात सर्व प्राध्यापक व विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.</td>
</tr>
<tr>
<td>25</td>
<td>Date: Tuesday, 31/10/2023<br>Bhrashtachar Virodhi Jan Jagriti<br>(भ्रष्टाचार विरोधी जनजागृती)<br>

</td>
<td>भ्रष्टाचार विरोधी जनजागृती – विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या निर्देशांनुसार सर्तकता. जागरुकता या कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.सर्वप्रथम प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांनी भ्रष्टाचार म्हणजे काय त्याची परिभाषा याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. शरद सांबारे, राज्यशात्र विभाग प्रमुख यांनी मार्गदर्शन केले. भ्रष्टाचार हि समाजाला लागलेली कीड आहे. लाच घेऊ नये व देऊ नये हि जागरुकता समाजात पसरविण्याचे काम युवा पिढीच करू शाते. टे करायला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.</td>
</tr>
<tr>
<td>26</td>
<td>Date: Thursday, 28/12/2023<br>Free Eye Checkup Camp<br>(मोफत नेत्र तपासणी शिबीर)<br>
</td>
<td>मोफत नेत्र तपासणी शिबीर - महाविद्यालयात लॉयन्स क्लबया समाजसेवी संस्थेच्या च्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ विद्यार्थी, पालक, शिक्षक, व शिक्षकेत्तर कार्नाचारी यांनी घेतला.</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>27</td>
<td>Date: Monday, 15/01/2024<br>Health Awareness Program<br>(आरोग्याची काळजी विषयावर मार्गदर्शन)<br><br><br></td>
<td>माजी अध्यक्षायशोदाबाई खापर्डे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "आरोग्याची काळजी" या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांच्या हस्तेमाजी अध्यक्षा यशोदाबाई खापर्डे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. मार्गदर्शनाकरिता करिता डॉ. रश्मी शुक्ला आयुर्वेदाचार्य, नागपूर यांना आमंत्रित करण्यात आले. व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्यस्वस्थ व निरोगी राहण्याकारिता काय करावे याबद्दल त्यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. त्यांनी शरीर प्रकृती चे प्रकार सांगितले. आपली दिनचर्या कशी असावी? आहार घेण्याची पद्धत, आहार कसा असावा, काय खावे काय खाऊ नये, केंव्हा खावे, आहारासोबत पाण्याचे महत्व, व्यायामाचे महत्व, विश्रांती याबद्दल सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ. धनराज शेटे सरांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.नेहमी आंनदी व तणावरहित राहवे. सकारात्मक विचार करावा. असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थिनी व लाईन्स क्लब चे काही सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेंद्र कटरे यांनी केले.</td>
</tr>
<tr>
<td>28</td>
<td>Date: 05-11/02/2024<br>Special NSS Annual Camp<br>(राष्ट्रीयसेवायोजना विशेष शिबीर)<br><br><br><br><br><br><br><br></td>
<td>महाविद्यालयातर्फे राष्ट्रीयसेवायोजना विशेष शिबीराचे आयोजन राष्ट्रीयसेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन दिनांक ०५ फेब्रुवारी २०२४ ते ११ फेब्रुवारी २०२४ पर्यंत समाज भवन पुनर्वसन खापरी येथे आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन डॉ.वर्षा भुजबळ समाजशास्त्र विभाग प्रमुख एल.ए.डी. महाविद्यालय नागपूर यांच्या हस्तेकरण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शरद सांबारे, श्रीमती रत्नमाला खापर्डे पुरुषोत्तम हेल्थ अँडएज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, प्रा. श्रीकांत घोगरे महाविद्यालय विकास समिती सदस्य, श्री मनीष खापर्डे तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. शिबिराचा समारोप : रविवार ११ फेब्रुवारी २०२४रोजी करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपसरपंच, सर्व प्राध्यापक उपस्थित होते.शिबिरात रोज सकाळी शिबिरार्थीना व्यायाम,सूर्यनमस्कार,व आसनाचे प्रशिक्षण देण्यात आले. श्रमदान अंतर्गत शिबीर परिसर, बौद्ध विहार, मंदिर, व ग्रामसफाई करण्यात आले.लोकांना श्रमदानाचे, स्वच्छतेचे व आरोग्यविषयी माहिती सांगण्यात आले. रोज शिबिरार्थी व गावातील लोकांना वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. नि:शुल्क रोगनिदान शिबीर : स्वामी विवेकानंद मिशन हॉस्पिटल खापरी येथील डॉ. कोमेजवार पी.एस.सी. सेंटर चे सहकारी यांनी गावातील लोकांची आरोग्य तपासणी केली व त्यांना औषधे दिली. व्यसन मुक्ती अभियान : साहस मुक्ती केंद्र मित्रनगर नागपूर तर्फे प्रा.रवी शेंडे यांनीव्यसन म्हणजे काय? कोणकोणते व्यसन व्यक्तीला होऊ सकते. त्यामुळे होणारे दुष्परिणाम, व्यसनापासून दूर राहण्यास कुटुंबातील व्यक्तीनि काय करावे, तसेच व्यसनाधीन व्यक्ती करिता साहस मुक्ती केंद्र कशा पद्धतीचे उपचार करतात याची पूर्ण माहिती दिली. लोकांच्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. व्यसनाचे काही पोस्टर प्रदर्शित केले. व्यक्तीमत्व विकास: श्रीमती आशा गजभिये मार्केटिंग हेड यांनी विद्यार्थीनीना यांनी शिबिरार्थीना व्यक्तीमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. शिबिरार्थीना स्वत:चे मत व्यक्त करण्यास प्रोत्साहित केले. कुमार अवस्थातेतील समस्या: श्रीमती मीरा कडवे यांनी कुमार अवस्थातेतील समस्यातसेच आरोग्याची काळजी या वीषयावर माहिती दिली. आहार, विहार, व्यायाम याचे महत्व सांगून आपली दिनचर्या कशी असावी याविषयी माहिती दिली. सांस्कुतिक कार्यक्रम: शिबिरार्थि द्वारे नुत्य, नाटिका सादर करण्यात आले. या शिबिरात शिबिरार्थिनी व गावकऱ्यानि उस्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराच्या आयोजनाकरिता प्राचार्य डॉ. शरद सांबारे, प्रा. डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे, डॉ. अमोल राऊत प्रा. घोगरे, डॉ. के.जी.मेश्राम, डॉ. रावळेकर, डॉ.कापशीकर, प्रा. जरिना सलीम, डॉ. रश्मी नारनवरे तसेच शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले.</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>29</td>
<td>Date: Thursday, 22/02/2024<br>Human Trafficking (मानवी तस्करी)<br>




</td>
<td>महविद्यालयातवूमन इम्पावरमेंट सेल व राष्ट्रीय सेवा योजना"मानवी तस्करी" विषयक मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. दिपाली मडावी प्रोजेक्ट कोआरडीनेटर, प्रकृती असोसियेशन (NGO), नागपूर, तसेच मंगला पुणेकर कोआरडीनेटर, युवा रुरल असोसियेशन (NGO), नागपूर, यांना मार्गदर्शन करिता आमंत्रित करण्यात आले. online सेक्स रॅकेट कसे चालतात. विद्यार्थी कसे गुन्हेगार बनतात हे सांगितले.त्यांनी वीडीओ दाखाविले. "मानवी तस्करी" थाबाविण्याकरिता पोलिसांची भूमिकेविषयी माहिती दिली. . त्यांनी "पोलीस दीदी उपक्रम" विषयी माहिती दिली. अल्पवयीन मुलीवर होणारे अत्याचार, प्रेमप्रकरण, सायबर क्राइम, (सोशल मिडिया द्वारा जे गुन्हे होतात) त्यातून महिलांनी आपली सुरक्षा कशी करावी याविषयी साध्या व सोप्या भाषेत विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.सोशल मिडियाची वास्तविकता विद्यार्थिनी समोर मांडली. मोबाईलचा उपयोग शिक्षणाकरिताच करावा. स्वतावर सयंम ठेवावा.चुकीचा स्पर्श ओळखण्यास शिकाजर काही वाईट घडले तर लगेच तक्रार नोंदवावी.सोशल मिडिया चा वापर करतांना सेकुरिटी असावी. क्लब अंतर्गत वेगवेगळे कार्यं आयोजीत करू, जनजागृती करू असे त्यांनी सांगितले. विद्यार्थीनिनी स्वतः जागृत व्हावे व इतरांना जागृत करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. स्वतः जागृत असायला पाहिजे आणि ते तेव्हांच शक्य आहे जेव्हा तुम्ही अशा कार्यक्रमात सहभागी व्हाल. स्वतःला सुरक्षित तेवण्याकरिता सोशल मिडिया चा कमी वापर, इतर गोष्टी कडे कमी व शिक्षणाकडे जास्त लक्ष केंद्रित करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविध्यालायातील विद्यार्थिनीचा भरघोस प्रतिसाद मिळाला.</td>
</tr>
<tr>
<td>30</td>
<td>Date: Wednesday, 20/03/2024<br>Save Water Awareness Program<br>
</td>
<td>महाविद्यालयात जल है तो कल है या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी विद्यार्थीनीना पाण्याचे महत्व या विषयाची पार्श्वभूमी सांगितले. प्रा. झारिना सलीम यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. पाणी हे मानवाकरिता सगळ्यात महत्वपूर्ण प्राकृतीक संसाधनापैकी एक आहे. भविष्यात पाण्याची अधिक समस्या होऊ नये म्हून जल संरक्षण गरजेचे आहे. त्याकरिता आपण काय करावे हे त्यांनी छोटे छोटे उदाहरण देऊन सांगितले. सर्वांनी मिळून पाण्याची बचत करायला पाहिजे व ती आपण करू अशी शपथ घेण्यात आली.प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होते.</td>
</tr>
<tr>
<td>31</td>
<td>Date: Friday, 22/03/2024<br>Save Water Day (जागतिक जल दिन)<br>
</td>
<td>जागतिक जल दिन - महाविद्यालयात जागतिक जल दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. डॉ. अमोल राउत व डॉ. ललिता पुन्नय्या यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थिनी द्वारे तयार केलेले पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनीसह रॅलीचे आयोजन करण्यात आले. स्न्हे नगर परिसरात रॅली काढण्यात आली. जल है तो कल हैया विषयावर आधारित घोषवाक्य म्हण्यात आले. रॅलीची सुरवात व शेवट महाविद्यालयात करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होते.</td>
</tr>
</table>